# राजनीतिज्ञः कालिदासः

कविकुलगुरु, कविशिरोमणि अशा बिरुदवल्या मोठ्या अभिमानाने मिरवणारा ज्येष्ठ श्रेष्ठ कवी, कवि कालिदास. हा महाकवी कालिदास नक्की कोणत्या काळात होऊन गेला यावर विद्वानांत मतभेद आहेत. विद्वानांच्या मते तो गुप्त वंशातील दुस-या चंद्रगुप्ताचा समकालिन होता. गुप्त घराण्याचा काळ चंद्र गुप्तापासून ते स्कन्द गुप्तापर्यंत इ. स. ३२० ते ६०० असा येतो. हा काळ भारतीय इतिहासातील सुवर्णयुग मानले जाते. धातुशास्त्र, कृषीशास्त्र, व्यापार, कला यांच्याबरोबरच धर्म आणि साहित्यातही या काळात फार मोठी प्रगती झाली होती. या सा-या वैभवाचा, प्रगतीचा तो साक्षीदार होता. एक सामर्थ्याशाली आणि तरीही सत्शील राजा किंवा राजघराणे राज्य करत असेल तर राष्ट्र कशी भरारी घेते हे सारे त्याने अनुभवले होते.

'यथा राजा तथा प्रजा' किंवा 'सर्वे धर्मा राजधर्मप्रधानः' अशा उक्तिंची सत्यता त्याच्या लक्षात आली होती. खंडकाव्य, नाटकं, कुमारसंभवासारख महाकाव्य लिहून झालं तरी त्याच मन भरलं नव्हतं. अजून काही तरी करायचं बाकी आहे असं त्याला मनातून नक्की वाटत असावं. हे काही तरी करणं म्हणजे उत्तम राजनीतीचा वस्तुपाठ लोकांच्या समोर ठेवायचा अस कालिदासाने नक्की केलं होतं. किंबहुना राजनीती कोरडी रूक्ष असेल तर ती कडू गोळी साखरेत घोळवून दिली पाहीजे हे लक्षात आणून रघुवंशासारख्या उच्च राजकुलाची निवड हेतुतः केली. पण ही अख्खी गोळी देण्याआधीच कालिदासाने आपल्या कार्याला प्रारंभ केला होता.

कुमारसंभवाचे पहिले काही सर्ग प्राधान्याने श्रृंगाररसप्रधान. पण त्यातही कालिदासाची राजनीती अगदी सहज प्रवेश करते. पहिल्या श्लोकात दगडमातीच्या हिमालयाला नगाधिराजा म्हणून निश्चित केल्यावर त्याचे अधिराजत्व सिध्द करण्यासाठी कालिदासाने सतरा श्लोक खर्च केले आहेत. या ठिकाणीच त्याला पृथ्वीचा मानदंड असे म्हटले आहे. मानदंड ह्याला वेगवेगळे अर्थ आहेत. कोणाला (अभि)मान झाला तर त्याला शासनाचा अधिकार म्हणजे मानदंड आणि एखाद्या गोष्टीचं मोजमाप करण्याचं साधन म्हणजे मानदंड किंवा मापदंड. भारतीय राजनीतीनुसार राजाला दंडाचा अधिकार तेव्हाच प्राप्त होतो जेव्हा तो 'मानदंड' (मापदंड) असतो. प्रजा राजाचं अनुकरण करत असते. त्यामुळे तो उत्तम गुणांनी युक्त असला पाहिजे. कौटिल्य म्हणतो जेव्हा असा दंडधारी राजा असतो तेव्हाच सर्व प्रजेला आपली कर्तव्ये योग्य प्रकारे करण्यास भाग पाडतो,

चतुर्वर्णाश्रमो लोको राज्ञा दण्डेन पालितः।
स्वधर्मकर्माभिरतो वर्तते स्वेषु वर्त्मसु।।(१४.१६)

स्वयमेव मृगेंद्रता असणा-या हिमालयाकडे शैलाधिपत्यत्व चालत आले होते ते त्याच्या गुणांमुळे.

यज्ञाङ्गयोनित्वमवेक्ष्य यस्य सारं धरित्रिधरणक्षमं च।
प्रजापतिः कल्पितयज्ञभागं शैलाधिपत्यं स्वयमन्वतिष्ठत्।। (१.१७).

कालिदासासाठी यज्ञावश्यक सोम इत्यादी वनस्पती हिमालय पुरवत होता ही गोष्ट त्याला अधिपती करायला पुरेशी नव्हती. राजा म्हणून पृथ्वीचं परिरक्षण महत्वाच! पृथ्वीला धरून ठेवण्याचं हिमालयाचं सामर्थ्य पाहून स्वतः ब्रह्मदेवाने त्याला 'शैलाधिपत्यत्व' देऊ केले होते.

आता राजा म्हटलं की त्याची राजचिन्ह आली. छत्र-चामरांशिवाय राजा कसा शोभून दिसणार? आणि इथे तर हा दगड-मातीचा पर्वत! त्याला चव-या कोण ढाळणार? पण कालिदासाने तो प्रश्न चुटकीसरशी सोडवला आहे,

लाङ्गूलविक्षेपविसर्पिशोभैरितस्ततश्चन्द्रमरीचिगौरैः।

यस्यार्थयुक्तं गिरिराजशब्दं कुर्वन्ति बालव्यजनैश्चमर्यः।। (कुमार. १.१३)

देवावर किंवा राजावर ढाळायची चवरी ज्यांच्या केसांपासून बनते ती चमरी नावाची हरणं हिमालयावर फिरत असताना आपल्या शेपट्या इकडे तिकडे फिरवतात. अशावेळी त्यांच्या शेपटीचे चकाकणारे केस फुलतात. त्यामुळे जणुकाही हिमालयाला चव-या ढाळून त्या त्याच 'गिरिराज' हे विशेषण अर्थपूर्ण करतात.

प्रजेचं विनायाधान, रक्षण व भरण हे राजाचं कर्तव्य. हिमालय त्याच्या प्रजेतील कोणाकोणाचं व कसं कसं रक्षण करत होता ते कालिदास सांगतो. अगदी दिवाभीतापासून ते सिध्दांपर्यंत सर्वांच रक्षण शैलाधिराज करतो. आपल्या राज्यातील वंदनीय अशा ऋषीमुनींच प्रत्येक परिस्थितीत रक्षण करायला हिमालय तत्पर आहे. उन्हाळ्यात जेव्हा त्याची श्रृंग तापतात तेव्हा कमरेपर्यंत खाली आलेल्या मेघमालांच्या सावलीचा आश्रय हे सिध्द घेतात. पण हे मेघच वर्षावृष्टी करू लागले तर कुणीकडे जायचं? पण त्यांची तिही समस्या हिमालय दूर करतो. मेघांची वृष्टी सुरू झाली की त्याच शिखरांच्या वरच्या भागाचा ऋषी आश्रय घेतात. थोडक्यात प्रत्येक वेळी हिमालय त्यांचे रक्षण करण्यास सिध्द आहे. पुन्हा आपल्या प्रजेच्या रक्षणात तो उच्च-नीच असा भेद बाळगत नाही. राज्यातील सामान्यातीसामान्य अशा दिवाभीताचं सुध्दा रक्षण तो करतो कारण 'क्षुद्रेऽपि नूनं शरणं प्रपन्ने ममत्वमुच्चैःशिरसां सतीव'। (कुमार. १.१२) सज्जनांना क्षुद्रलोकांविषयीसुध्दा कळवळा असतो.

कालिदासाचे नायक केवळ शारीरिक उपभोगांसाठी विवाह करत नाहीत त्यामागे एक निश्चित प्रयोजन असतं. हिमालय विवाह करतो तोही काही एका हेतूने,

स मानसीं मेरुसखः पितृणां कन्यां कुलस्य स्थितये स्थितिज्ञः।

मेनां मुनीनामपि माननीयामात्मानुरूपां विधिनोपयेमे।।(कुमार. १.१८)

आपल्याला अनुरूप, मुनींनाही माननीय अशा मेनेशी हिमालय विवाह करायला तयार झाला तो कुल सातत्य टिकवण्यासाठी. व्यक्तिगत कुलाचं सातत्य जसं महत्वाचं तस राजा म्हणून राजकुलाचं सातत्यही महत्वाचं. आपला उत्तराधिकारी देणं हे राजाचं प्रधान कर्तव्य. आणि ही स्थिती जाणणा-या तो 'स्थितिज्ञ' हिमालय मेनेशी विवाह करता झाला.

शैलाधिराज हिमालयाला कन्या झाली. तशी पाहाता एक सामान्य घटना. पण कालिदास ही कथा सांगताना राजनीतीतील एक महत्वाचा सिध्दान्त आपल्यापुढे ठेवतो.

सा भूधराणामधिपेन तस्यां समाधिमत्यामुदपादि भव्या।

सम्यक्प्रयोगादपरिक्षतायां नीताविवोत्साहगुणेन संपत्।।(कुमार. १.२२)

राजा ज्याप्रमाणे सम्यकप्रयोगाने म्हणजे योग्य आचरणाने नीती आणि उत्साहगुणाने युक्त होऊन अपरिक्षत म्हणजे अखंड संपत्ती निर्माण करतो त्याप्रमाणे ह्या शैलाधिपतीने नियमांचे आचरण करणा-या मेनेच्या ठायी पार्वतीरूपी संपत्ती निर्माण केली. येथे कालिदास उत्साहगुणाचा उल्लेख करतो. अर्थशास्त्रात, 'शक्तिस्त्रिविधा ज्ञानबलं मन्त्रशक्तिः कोशदण्डबलं प्रभुशक्तिः विक्रमबलमुत्साहशक्तिः' (अर्थ. ६.२.३४) म्हणजे ज्ञानानीयुक्त ती मंत्रशक्ती, कोश व सैन्यानी

परिपूर्ण प्रभुशक्ती आणि पराक्रमाने युक्त ती उत्साहशक्ती अशा तीन शक्ती सांगितल्या आहेत. राजा ह्या तीन शक्तींनी युक्त असलाच पाहिजे. पार्वतीची तुलना संपत्तीशी केली आहे. राजकोश अखंड आणि योग्य प्रयत्नाने राजाने भरला पाहिजे हा राजनीतीतील एक महत्वाचा नियम पार्वती जन्माची कथा सांगता सांगता कालिदास देतो. अगदी अशीच कल्पना रघुजन्माच्या निमित्ताने दिली आहे,

ग्रहैस्ततः पञ्चभिरुच्चसंश्रयैरसूर्यगैः सूचितभाग्यसंपदम्।
असूत पुत्रं समये शचीसमा त्रिसाधना शक्तिरिवार्थमक्षयम्।(रघु ३.१३)

राजाची प्रभु, उत्साह आणि मंत्र अशी त्रिगुणात्मकशक्ती ज्याप्रमाणे अक्षय संपत्ती घेऊन येते त्याप्रमाणे ती इंद्राणीप्रमाणे असणारी राणी, उदित व उच्चीच्या पाच ग्रहांनी ज्याची भाग्यसंपदा सुपूजित केली आहे अशा पुत्राला योग्य काली जन्म देती झाली.

इथे सुध्दा पुत्रजन्माशी तीन शक्ती व संपत्तीचा अन्योन्य संबंध कालिदासाने लावला आहे.

कुमारसंभव काव्यातील पाचवा सर्ग म्हणजे उत्तम नाट्य. कठोर तप करणा-या पार्वतीची परीक्षा घ्यायला स्वतः तिचा भावी पती बटुवेश घेऊन आला आहे. हा बटु रेखाटताना कालिदासाच्या मनात निश्चितपणे अर्थशास्त्रातील परमर्मज्ञः प्रगल्भः छात्रः कापटिकः। (अर्थ (अर्थ १.११.२) आहे. गुप्तहेरांच्या यादीत पहिला येतो तो कापटिक. विद्यार्थी असल्याने भिक्षेच्या निमित्ताने तो कुठेही जाऊ शकतो आणि अजून लहान असल्याने स्त्रियासुध्दा त्याच्याशी मोकळेपणी बोलू शकतात. दुस-याचं मर्म जाणण्यात पारंगत असा हा विद्यार्थीवेशातील गुप्तहेर - कापटिक. कालिदासाचा बटू या सगळ्या वर्णनाशी मिळता जुळता आहे.

अथाजिनाषाढधरः प्रगल्भवाग्ज्वलन्निव ब्रह्ममयेन तेजसा।
विवेश कश्चिज्जटिलस्तपोवनं शरीरबध्दः प्रथमाश्रमो यथा।।(५.३०)

हा बटु प्रथम आश्रमातला आहे, या आश्रमाला अनुसरून बळकट देहयष्टी आहे, विद्याभ्यासाचं तेज त्याच्या चेह-यावर झळकत आहे आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे तो प्रगल्भवाक् आहे. आपल्या वाणीच्या सामर्थ्यावर पार्वतीच मर्म जाणण्यासाठी बटुने साधलेला संवाद साहित्यरसिकांची मन जिंकतोच पण पार्वतीही त्याला सगळ सांगून बसते.

कुमाराच्या दुस-या सर्गात राजनीतीतील आणखी एक महत्वाची गोष्ट तो नमूद करतो. प्रसंग आहे, तारकाच्या अत्याचारी वर्णनाचा. सा-या देवांनी आपली हतबलता व्यक्त केली आहे. सर्व प्रकारे आम्ही त्याची सेवा केरूनसुध्दा तो शांत होत नाही,

इत्थंमाराध्यामानोऽपि क्लिश्नाति भुवनत्रयम्।
शाम्यत्पत्यपकारेण नोपकारेण दुर्जनः।। (कुमार २.४०)

दुर्जन उपकाराने शात होत नाहीत अपकारानेच त्यांना शांत करावं लागत. राजनीतीतलं हे वास्तव तारकाच्या निमित्ताने कालिदास सांगून जातो.

यथा राजा तथा प्रजा ही उक्ती ज्ञात असल्याने आणि रघुकुलातील राजे अनेक उत्तमोत्म गुणांनी युक्त असल्याने कालिदास त्यांच्या गुणवर्णनात रंगून गेला आहे,

ज्ञाने मौनं क्षमा शक्तौ त्यागे श्लाघा विपर्ययः।
गुणा गुणानुबन्धित्वात्तस्य सप्रसवा इव।। (रघु. १.२२)

रघुकुलातील राजांकडे ज्ञान होतं तरी ते बढाईखोर नव्हते, शक्ती होती म्हणून क्षमेचा अधिकार त्यांना होता (कारण दुर्बलाच्या क्षमेला काडीची किंमत नसते), दानीवृत्ती होती पण आत्मस्तुती नव्हती अशा परस्पर विरोधी गुणांनी ते युक्त होते.

भारतीय परंपरेत राजर्षी अशी संज्ञा आहे. राजा असून ऋषीसारख आचरण करणारा तो राजर्षी. अशा राजाचं सुख कशात असते ते अर्थशास्त्रात सांगितले आहे-

प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्।
न आत्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम्।। (अर्थ, १.१९.१२)

रघुकुलातील राजांनी हे सूत्र अंगी बाणवलं होतं. पण हे सूत्र अंगी बाणवण्यासाठी त्यांच्या विचारचं आणि जीवनाचं सूत्र समजणं महत्वाचं आहे.

शैशवेभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम्।
वार्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम्।। (रघु. १.८)

आश्रमव्यवस्थेनुसार आयुष्य चार टप्प्यांत विभागले आहे. ह्या प्रत्येक टप्प्यावर एकेक आश्रम व त्याची कर्तव्ये आहेत. रघुराजे त्यांच पालन सुयोग्य रितीने करतं होते. पहिला आश्रम ब्रह्मचर्य. त्यात अभ्यास हेच कर्तव्य. हे राजे त्यात अगदी गुंगून गेलेले असत. दुसरा टप्पा गृहस्थाश्रमाचा. स्वाभाविकच त्यात आयुष्यातल्या विविध विषयांचा आनंद ते घेत होते. आयुष्याचा उपभोग व कर्तव्य या आश्रमात पूर्ण झाल्यानंतर येतो तो वानप्रस्थ. या आश्रमात ऐहिक गोष्टींतून मन काढून घेऊन हळुहळू मुनीवत आचरण केले पाहिजे. एका अत्युच्च पदावर बसल्यानंतर व सर्व प्रकारच्या वैभवाचा उपभोग घेतल्यानंतर ही विरक्ती साधणं अतिशय कठीण. पण रघुकुलातील राजे शांतपणे मुनी जीवनाचा स्वीकार करतं होते आणि सरते शेवटी योगशास्त्रात पारंगत असलेले ते सारे आपल्या देहाचीही आसक्ती सोडून देत होते. सगळ्या वैभवात असून ही अलिप्तता किंवा पद्मपत्र इव अम्भसा ही वृत्ती प्राप्त करणं कठीण आहे पण ते या राजांनी केल्याचे दिसून येते. याच वृत्तीमुळे रामदासांनी शिवाजीला ‘श्रीमानयोगी’ हे विशेषण दिले होते.

षड्भागभृत् किंवा बलिभुक् ही राजाची विशेषणे. तो प्रजेकडून बली म्हणजे कर घेणारच अन्यथा राज्य चालणार कशावर? पण हा बली किंवा कर घेण्याचा त्यांचा उद्देश सांगताना कालिदास म्हणतो,

प्रजानामेव भूत्यर्थं स ताभ्यो बलिमग्रहीत्।
सहस्रगुणमुत्स्रष्टूमादत्ते हि रसं रविः।। (रघु. १.१८)

सूर्य ज्याप्रमाणे सागराकडून जलभार स्वीकारतो तो सहस्रपटिंनी देण्याकरता त्याप्रमाणे रघुकुलातले राजे करभार घेत ते प्रजेच्या वैभवासाठी!

संपूर्ण राजनीतीचा हेतू प्रजासुखे सुखं राज्ञः असेल तर या राजांनी तो निश्चितपणे जाणला होता. म्हणूनच रघुच्या वर्णनाच्या निमित्ताने कालिदास राजा शब्दाची व्युत्पत्ती देताना सांगतो,

... तथैव सोऽभूदन्वर्थो राजा प्रकृतिरञ्जनाद्।। (रघु. ४.१२)

प्रजेच्या रञ्जनात कोणतीही कसूर हे राजे करत नव्हते आणि म्हणून प्रजेचं रंजन करण्याच्या त्यांच्या वृत्तीने राज हा शब्द अर्थवाही झाला.

राजनीतीतील एकापेक्षा एक सरस सूत्र लीलया सांगून आपलं क्रांतदर्शित्व सिध्द करणा-या त्या राजनीतीज्ञ कालिदासाला शतशः वंदन...!

आसावरी (पद्‌मा) उदय बापट
ब - ७, स्वप्नघर,
तरुण भारत सोसायटी,
चकाला, अंधेरी (पूर्व),
मुबई - ४०००९९